REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER – 2017

# सांस्कृतिक दहशतवाद स्वरुप



प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर,जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).

## प्रस्तावना

सांप्रदायिक दहशतवादाने जगात जो उच्च्छाद मांडला आहे व जीवित व वित्त हानी बरोबरच मुस्लीम व मुस्लीमेत्तर समाजाच्या मनात जी संशयाची व द्वेषाची भावना निर्माण केली आहे ती कधीही भरुन न निघणारी आहे. दहशतवादी कारवाईने भौतिक साधनसामुग्री तर नष्ट झाली पण त्याहीपेक्षा माणसामध्ये क्रौर्य कोणती परिसिमा गाठू शकते हेही जगाला कळाले. माणसाइतका क्रुर प्राणी दुसरा असूच शकत नाही या सत्याची प्रचिती सतत येत आहे. प्रत्येक व्यक्ती ही आपल्या धर्माबद्दल अस्मिता बाळगते. त्यावर प्रेम करते यात गैर काही नाही. मात्र व्यक्तीची ही धार्मिकभावना अत्यतिंक स्वरुप धारण करते तेव्हा भारतासारख्या बहूधार्मिक देशात हीच बाब अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह ठरते. सांप्रदायिकवादाचे हेच मुख्य लक्षण आहे. अती अभिमान बाळगणे हाच आज दहशतवाद आहे. व्यक्तीच्या मनामध्ये भितीची भावना रुजविण्यासाठी केलेली हिंसात्मक कृती म्हणजे दहशतवाद ही आज जागतिक समस्या आहे. भारताच्या संदर्भात ही बाब अलीकडे दाहक स्वरुप धारण केली आहे. या देशाच्या एकात्मतेसंदर्भात व धर्मनिरपेक्ष संदर्भात काही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहेत.

सांप्रदायीकता जेव्हा अन्य धर्मीयाच्या समुदायाचे अस्तित्व नाकारते तेव्हा ती एक राष्ट्रविघातक प्रवृत्ती ठरते. एखादा लोकसमूह स्वत:च्या जमातीच्या निष्ठेला राष्ट्रीय निष्ठेपेक्षा श्रेष्ट माणून त्या राष्ट्रातील अन्य जमातीबाबत क्रियात्मक वैरभाव बाळगतो तेव्हा तो सांप्रदायीक दहशतवाद म्हणून ओळखला जातो. थोडक्यात इतर धर्मसमुदायाबाबत आक्रमक व असहिष्णू असणे व त्यासाठी सक्रीय कृती करणे यालाच धार्मीक संप्रदाय वाद म्हणतात.

भारतीय स्वातंत्र्याच्या समान ध्येयाना पुर्तता झाल्यावर या देशातील राष्ट्रीय एकात्मतेची भावना हळूहळू ओसरली. संकुचित ध्येय वादाने बेबंद होवून त्यांनी आक्राळविक्राळ स्वरुप धारण केले. फाळणीनंतर हिंदू-मुस्लीमांच्या रक्त व भीती याने स्वातंत्र्य कलंकित झाले. कारगीलपासून ते कन्याकुमारीपर्यंत आणि गोहाटी पासून ते चौपाटीपर्यंत देशातील एकही भाग सांप्रदायीक धोक्यापासून दूर राहिलेला नाही. १६ एप्रिल १९७९ च्या एका संसदीय अहवालात अशी नोंद आहे की, स्वातंत्र्योत्तरच्या ३२ वर्षात एकंदर नऊ हजार जातीय दंगली घडून आल्या. आजपर्यंत यात दुप्पटी व तिप्पटीने वाढ झाली.

गेल्या काही वर्षापासुन जमातवादाने अस्मितेचा प्रश्न निर्माण केलेला आहे. धर्मकारण व राजकारण याची सरमिसळ झाल्यामुळे धार्मिक मुलतत्ववादाचा जन्म होतो. मुलतत्ववाद जसा हिंदूमध्ये आहे तसा मुस्लिमामध्ये आहे. विश्व हिंदू परिषद, बजरंगदल, यानी समाजात मुस्लीम द्वेषाचे विष पेरले. राजीव गांधीनीही मुस्लीम स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या कायद्याला आधार दिला व मुलतत्ववादाला विजय मिळवून दिला. देशातील हिंदूच्या मनात मुस्लीम समाजाच्या राष्ट्रप्रेमाविषयी नेहमीच साशंकता वाटत आली आहे. तर मुस्लीमांच्या मनात नेहमीच असुरक्षिततेची भावना राहत आली आहे.

अलीकडे गुजरात मध्ये जी घटना घडली त्याचे स्वरुप अतिशय भीषण असून त्यामुळे संपूर्ण देश हादरुन गेलेला आहे. या घटनेची पार्श्वभूमी म्हणजे २७ फेब्रुवारी २००२ या दिवशी अयोध्येत गेलेल्या कारसेवकांना घेवून येणारी

साबरमती एक्सप्रेस गोध्रा स्टेशनवर आली त्यास आग लावण्यात आली त्यात ५९ कारसेवक डब्यातच आगीमध्ये होरपळून मरण पावले. मात्र या घटनेचे प्रत्यूत्तर म्हणून उद्भवलेल्या हिंसाचारात ६०७ जणांची आहूती पडली. मुस्लीम अल्पसंख्याक असणाऱ्या भागात मुस्लिमांची कत्तल केली गेली. भोसकून, जाळून, किंवा बंदूकीच्या गोळीबारात मोठी माणसे, स्त्रिया, मुले यापैकी कोणीच अपवाद केले गेले नाही. अहमदाबाद मधील दंगलीने थैमान घातले. बडोदा, भावनगर, राजकोट, सुरत क्रमाक्रमाने पेटत राहिले हे क्रुर लोण गुजरातमधील ग्रामीण भागात पोहचले. राज्यभर गुजरातत सर्व प्रकारचे अत्याचार चालू असताना राज्यात शासन आहे की नाही अशी परिस्थिती होती. गोध्रा घटनेमुळे प्रतिक्रिया म्हणून गुजरातमध्ये हिंसाचाराचा भडका उडाला. प्रधानमंत्र्याच्या अवाहनाला न जुमानता भाजपचे कार्यकर्ते विहीप व बजरंग दलाच्या आदेशाचे पालन करीत होते. १९८४ साली इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यावर शिखाच्या ज्या अमानुष कत्तली काँग्रेस राजकारण्यांनी घडवून आणला त्यावेळी "मोठा वृक्ष कोसळला की जमीनीला हादरे बसणारच" असे निषेधार्थ उद्‌गार राजीव गांधीनी काढले होते त्याच धर्तीवर नरेंद्र मोदी यांनी "एवढे मोठे हत्याकांड गोध्रा येथे झाले असताना त्याची प्रतिक्रिया राज्यभर उठणे साहजीकच आहे" असे म्हणून या परिस्थितीत न्यूटनचा क्रिया आणि प्रतिक्रिया विषयक तिसरा नियम सद्य परिस्थितीत लागु पडतो असे पत्रकारांशी बोलतांना सांगितले आहे.

दंगलीना सुरुवात झाल्यानंतर लष्कर मागवण्यास झालेला उशीर, पोलीस कमीशनरचा मोबाईल चालु नसणे या सर्व गोष्टी शासनकर्त्याच्या नाकर्तेपणाच दाखवितात. राम मंदीर हा न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेरचा प्रश्न आहे असे एकेकाळी रथयात्रेचे नेतृत्व करणारे लालकृष्ण अडवाणी यांनी ठणकावून सांगितले होते. त्यांनाच आज गृहखात्याची जबाबदारी सांभाळण्यासाठी कायदा मोडण्याऱ्याची गय केली जाणार नाही असा दम द्यावा लागतो. यापेक्षा मोठा विनोद नाही.

गोध्रा हत्याकांडाबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, स्वयंसेवी संघटना, प्रसिध्द व्यक्ती, अशा व्यक्तीने संशोधन केले. सर्वांचे एकमत आहे की, मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांचे सरकार विहीप, बजरंग दल, आरएसएस, भाजप व त्या पक्षाची युवक आघाडी, भारतीय जनता युवा मोर्चा, या संघटनेबरोबर हातमिळवणी करुन मुस्लीम नागरिकांवर अत्याचार करत आहेत. पोलीस यंत्रणेला मंत्री तशा प्रकारचे आदेश देत आहेत. शासन यंत्रणा, पोलीस व हिंदुत्ववादी संघटना एकत्र येवून मुसलमानांना वेढा घालून त्यांच्या व त्यांच्या घरादाराचा संहार करीत आहेत. मुसलमानांची अर्थव्यवस्था, मालमत्ता नष्ट करण्याच उद्दिष्ठ यातून स्पष्ट होते. संपूर्ण राज्यात नरसंहार चालु आहे. मुस्लीम वस्त्यावर सशस्त्र हल्ले करीत आहेत.

या घटनेचा खोलात जावून विचार केला तर गोध्राचे (हिंदू दहशतवादाचे) आव्हान देशाला आहे. राष्ट्राच्या पायाभूत मुल्यांना हिंदुत्ववादाने हादरे दिले आहेत. आपला फॅसिष्ट चेहरा उघड केला आहे. १५ ऑगस्ट निर्माण झालेले व २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेने बांधलेले भारत नावाचे आधूनिक राष्ट्र टिकवायचे की मोडून टाकावयाचे? कारगील युध्दात आपल्या सैन्याचे परकीय आक्रमण बलीदान करुन परतावून लावले. गुजरातमध्ये झालेले आक्रमण वेगळया स्वरुपाचे आहे. हिंदू शासनाच्या मदतीने दुसऱ्या देशबांधवावर जीवानिशी संपवीत आहेत. कारगील पेक्षाही जास्त लोक गोध्रा हत्याकांडात बळी पडले आहेत. परकीय आक्रमणापेक्षा हे आक्रमण भयंकर उत्पात घडविणारे आहे. हे नागरी युध्द आहे ही यादवी आहे. अखील भारतीय पातळीवर समाजात उभी फूट पाडण्याचा हा डाव आहे. ही हिटलरी प्रवृत्ती आहे.

दारुच्या नशेपेक्षा धर्मद्वेषाची नशा अधिक बेहोश करते. हिंदु धर्मियांची सहिष्णूता हा अंगभूत गुण गुजरातमधल्या हिंदुत्ववादाच्या वादळात उडूल गेलाच. धर्माची नशा एवढी चढली की आपण माणूस आहोत ज्याच्यावर हल्ले करीत आहेत तिही माणसेच आहेत हेही विसरले.

देशाने २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटनेला सर्वोच्च मानले. सामाजिक व राजकीय जीवन राज्यघटनेच्या चौकोटीत चालेल. सर्व धर्मग्रंथ खाजगी जीवनापुरते मर्यादित आहेत. त्याअधारे दोन नागरिकांचे सार्वजनिक नाते नियंत्रीत होणार नाहीत हे ठरले. त्या पायावर शासन, संसद, विधीमंडळे, न्यायालये या संस्था उभ्या राहिल्या. कायदेकानून न्यायालये या सर्वांचा आधार राज्य घटना हाच आहे. ५२ वर्षानंतर आता कायद्यापेक्षा धार्मीक श्रध्दा श्रेष्ठ असे सांगण्यात आले. प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी उत्तर प्रदेशच्या निवडणूकात म्हणाले की, "मुसलमान मताची आम्हाला गरज नाही" गोध्रामधील घटनेची प्रतिक्रिया म्हणून गुजरातमध्ये हिंसाचार झाला.

फॅसिस्ट विचारसरणीचे मुख्य अन्न द्वेष हे असते. कधी मुसलमानाचा, कधी ख्रिश्चनाचा, कधी बौध्दाचा तर कधी दलितांचा, कधी उदारमतवाद्यांचा, कधी लोकशाही कायद्याचा. समता, बंधुत्व व सामाजिक न्याय मानणाऱ्यांना त्यांची श्रध्दा लोकशाहीवर असते. बहूसंख्याकाचा कैवार घेण्याचे नाटक करुन अल्पसंख्याकावर दहशत निर्माण करणे ही त्याची रणनिती आहे. हिटलर यांनी जर्मनीत "स्ट्रॉर्म ट्रुपर्स" मदतीने सर्व भिंती एका वाक्यात रंगवल्या. "देशात देशद्रोही आहेत" पुढील आठवडयात त्याच जागी एक नवीन घोषणा रंगवली "देशद्रोह्यांना ठेचून मारले पाहिजे" नंतर तिसरी घोषणा केली "ज्यू

वंशाचे लोक देशद्रोही आहेत" गुजतरातमध्ये नेमकी याच द्वेषाची मोहिम चालु आहे. विहीपने छापील पत्रके वाटली. शिर्षस्थानी "सत्यम, शिवम्, सुंदरम्"असे लिहीले आहे. "जय श्रीराम संबोधून हिंदू बांधवाने उठा, जागे व्हा, विचार करा, देश वाचवा, हिंदू धर्म वाचवा" त्यासाठी आर्थिक बहिष्कार हाच उपाय आहे. देशद्रोही हिंदुकडून पैसे मिळवून हिंदूना नष्ट करीत आहेत. आपल्या आया बहिणीवर अत्याचार करीत आहेत. त्यांचे कंबरडे मोडायचे असेल तर आर्थिक बहिष्कार टाकण्याची चळवळ चालविणे आगत्याचे आहे. त्यासाठी प्रतिज्ञा करा, संकल्प करा.

१. माझ्या दुकानातून मुस्लीम (ग्राहकांना) काहीही देणार नाही.
२. मी मुस्लिमांच्या दुकानातून काहीही खरेदी करणार नाही.
३. सुई ते सोने यापैकी मुस्लीमाने तयार केलेले काही खरेदी करणार नाही व विकणार नाही.
४. ज्या सिनेमात मुस्लिम नायक असेल त्यावर बहीष्कार टाकीन,
५. मुस्लीम मालकाकडे मी काम करणार नाही किंवा मुस्लीमांना नोकरीला ठेवणार नाही.
६. आपल्या गृह सोसायटीत, बँकेत मुस्लीमांना स्थान मिळू देणार नाही.
७. हिंदूनिष्ठ म्हणनाऱ्यांनाच मतदान करेन
८. हिंदु मुलींनी मुस्लीम मुलास बोलू नये
९. मुस्लीम शिक्षकांकडून काहीही शिकणार नाही.

"जय श्रीराम" अशी लाखो पत्रके गुजरातमध्ये लोकांना वाटली गेली. त्यातून मुस्लिम द्वेष निर्माण झाला. सुमारे एक लाख लोक दंगलग्रस्ताच्या छावणीत राहत आहेत. एकेक माणूस म्हणजे माणूस निर्मित आपत्तीची जीवंत कहाणी आहे.

बापू हम शर्मिंदा है ।
तेरे कातील जिंदा है ।

जगाला भारताची जी ओळख करुन देण्यात येते ती गांधीजीमुळे. मं. गांधीचे नाव पुसुन टाकावयाचे म्हणजे भारताची ओळख संपवायची. म्हणून हे आव्हान सर्व भारतीयांपुढे आहे. स्वतंत्र सार्वभौम, जातीनिरपेक्ष, राष्ट्र हे गांधीजीचे स्वप्न होते. अहिंसा हे त्यांचे तत्वज्ञान होते. गांधीवाद हाच देशाला व जगाला तारणारे तत्वज्ञान आहे. १९२० मध्ये चौरीचौरा येथे असहकार चळवळीत हिंसा झाली. चौरीचौरा येथे पोलीसानी सत्याग्रहावर अत्याचार केले मशाल मिरवणूकीत प्रतिक्रिया म्हणून पोलीस ठाणे जाळले म्हणून गांधीजींनी आंदोलन मागे घेतले. गांधीजी त्यांच्या घरी जावून त्याच्या विधवांची माफी मागीतली ज्या पोलिसांच्या स्त्रिया विधवा झाल्या त्याना आपण काय उत्तर देणार त्यामुळे चळवळीची नैतिक उंची वाढली.

आपल्याला निवड करावयाची एका बाजुला, सुडाचा उन्माद तर दुसऱ्या बाजूला, उध्वस्त झालेल्या बद्दल करुणा, गोध्रा म्हणजे हिंसाचाराचे परमीट नाही. आधी हिंसाचार कोणी केला. सुड हा उपाय नाही. गांधीजीची करुणा व अहिंसा हाच उपाय आहे. पशुतेला उत्तर पशुता नाही तर करुणा आहे. हा गांधीजीचा संदेश भारताने कधीही विसरता कामा नये. दहशतवाद हा सुडाचा प्रवास आहे. तो कधीच न संपणारा आहे. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फाळणीच्या प्रसंगी गांधीजी बंगालमधील नौखाली येथे हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठी खेडेपाडयात फिरत होते. सभा घेवून गीता, बायबल, कुराणचे सार लोकांना सांगत होते. ते म्हणत आपणास सहजीवन हवे आहे. हिंसाचाराचे कोणत्याही प्रकारचे समर्थन करता येत नाही. असेच एकदा ते एका गावी गेले असता लोक बाहेर येईनात. गांधीजी व्यवहार चतुर होते त्यानी छोटया मुलांना चेंडू खेळण्याच्या निमीत्ताने एकत्र बोलावले. पालकांना उद्देशून ते म्हणाले अरे तुमची मुल एकत्र येवू शकतात तुम्ही का नाही? गांधी उमेदीने पाठपुरावा करीत राहिले. हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी गांधीजींनी उपोषण केले. दंगे थांबावेत म्हणून पंतप्रधान नेहरुंनी गांधीजींचे प्राण वाचवावे असे आवाहन केले. या संदर्भात लॉ. माऊंट बॅटन यांनी one man boundary mission असे यथार्थ शब्दांत गांधीजींचे वर्णन केलेले आहे.

## संविधान आणि हिंदूत्ववाद

२६. जानेवारी १९५० रोजी स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक राज्य म्हणून उदयास आले. या धर्मनिरपेक्ष राष्ट्राचा आधारभूत विचार धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा सिध्दांत आहे. हिंदूत्ववाद्यांनी या सिध्दांताला आव्हान देणे सुरू केले या सैध्दांतिकतेची मांडणी ज्या भारतीय संविधानात केली आहे त्या संविधानासंबंधी जनमाणसात सभ्रंम अवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न हिंदूत्वावाद्यांनी सुरू केलेला आहे. भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्ष तत्वाला कधीही स्युडो सेक्युलर

संबोधून तर कधी पाश्चात्य धर्तीवरील भारतीय आत्मा नसलेली राज्यघटना म्हणून भारतीय संविधानाचा अवहेलनात्मक विचार मांडला. भारतीय संविधानाला ५० वर्षे पुर्ण झाली. आतापर्यंत ५० पेक्षा जास्त दुरुस्त्या झाल्या तेव्हा एक आयोग नेमून संपूर्ण घटनेचे पुनरावलोकन करावे असे ठरवले. घटना दुरुस्तीची तरतुद ३६८ व्या कलमात नमुद केलेली आहे. पण किरकोळ दुरुस्ती नको तर पुनरावलोकन हवे अशी हिंदुत्वाद्यांची मागणी आहे तेव्हा एक आयोग नेमुन संपूर्ण घटनेचे पुनरावलोकन करावे. नवी घटना समीती बोलवावी व घटना बदलुन नवी घटना करावी असा हिंदूत्ववाद्यांचा प्रस्ताव आहे. त्यानुसार १३ फेब्रुवारी २००० रोजी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व्यंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्य असलेली घटना समितीची स्थापना करण्याची औपचारिक घोषणा केली. लोकसभेचे माजी सभापती सुभाष कश्यप हे या समितीचे सदस्य सचिव असून इतर सदस्यामध्ये लोकसभेचे माजी सभापती पी.ए. संगमा, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्या. बी.पी. जीवनरेड्डी, विधी आयोगाचे न्या. आर.एस. सरकारीया, सॉलीसिटर जनरल सोला सोराबजी, माजी ॲटर्नी जनरल के प्रकाशन, माजी नोकरशहा व मुत्सदी आबीद हुसेन, प्रसिध्द पत्रकार व घटना तज्ञ सी.आर. इराणी, म. गांधीची नात सुमित्रा कुलकर्णी आणि श्री पुनय्या यांचा समावेश केला गेला होता. गेल्या ५० वर्षातील भारतीय राज्यघटनेच्या कार्यप्रणालीची समिक्षा करुन ही घटना बदलत्या काळाच्या, कार्यक्षमता, सरळता, परिणामकारकता, सामाजिक अर्थकारण व लोकशाही या गरजाच्या दृष्टीने कशी लागू करता येईल या बाबतची शिफारस करणे अशी या समितीची कार्यकक्षा (Term of Reference) निश्चित करण्यात आलेली होती. समितीच्या कार्यकक्षेचे स्पष्टीकरण स्वतःच करावयाचे आहे. अशा आयोगाची खरीचं आवश्यकता होती काय? घटना दुरुस्ती विषयक तरतुदी पुरेशी नाहीत काय? भारतीय राज्य घटनेत आयोग विषयक तरतुद नसताना ते का नेमले गेले? घटनेत आंतरीक परिवर्तन करावयाचा का ? राज्यघटनेचा ढाचा बदलावयाचा आहे काय? एनडीए सरकारला राज्यघटना बदलासाठी पुरेसे बहुमत नसताना त्यांनी हा पवित्रा का घेतला?

भाजपाचा आधार असलेल्या विहीप व आरएसएस ची भूमिका काय? यासारखे अनेक प्रश्न निर्माण होतात. अरुण शौरीचे पुस्तक (Worshiping False God) बाबासाहेब खोटा देव आहे. १९९७ ला प्रकाशित झाले आणि घटना पुनर्विलोकनाचा मुद्दा उपस्थित झाला १९९८ चा हा केवळ योगायोग नाही.

स्वातंत्र्यलढयातील मुल्ये घटनेत नमुद आहेत. डॉ आंबेडकरांचे योगदान फार मोठे आहे. हे आता पन्नास वर्षानंतर समाजातील काही वर्गाना असह्य वाटू लागले आहे. मुळात या वर्गाला समता, सामाजिक न्याय ही तत्वे मान्य नाहीत. लोकशाही त्यांना आवडत नाही. सध्याच्या शासन व्यवस्थेत गुणवत्तेला स्थान नाही असे त्यांना वाटते. संविधानामध्ये अल्पसंख्याकांना भाषिक व धार्मिक कलम २९/३० मध्ये संरक्षण दिले आहे. मागासवर्गीयाना कलम १४६ नुसार राखीव जागा देण्यात आलेल्या आहेत. राखीव जागाही त्यांच्या डोळयात सलतात. संघराज्य पध्दतीऐवजी एकात्म राज्यपध्दती बरी. संसदीय लोकशाही पेक्षा अध्यक्षीय पध्दत भारताला बरी. समान नागरी कायदा सक्तीचा करावा. काश्मिरला विशेष स्थान असलेले ३७० वे कलम रद्द करावे. संस्कृत राष्ट्रभाषा करावी. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज बदलावे असे अनेक हेतू मनात ठेवून घटनापूनर्विलोकनाची मागणी त्यांनी केलेली आहे. यासंदर्भात हिंदूत्ववाद्यांची मते पुढीलप्रमाणे आहेत.

गोळवळकर गुरुजी म्हणतात, "भारतीय घटना भारतीयांच्या अनुभवातून उदयास आलेली नाही ती परकीय घटनेची तुकडेमोड आहे. लोकशाहीवर भाष्य करताना ते म्हणतात लोकशाही ही स्वार्थाच्या वृध्दीस कारणीभूत होते. ती मनुष्याला शांती देत नाही. ती माणसाला माणसाविरुध्द उठवते. त्यात अध्यात्मकितेच्या वृध्दीस वाव नाही. स्वगौरव व परनिंदा यामुळे निवडणूकीमध्ये अध्यात्मिकता ठार मारली जाते"

हिंदुशासन व समाजपध्दतीचे समर्थन करताना ते म्हणतात या पध्दतीत व्यक्तीस्वातंत्र्य व सामाजिक ऐक्य याची हमी आहे. जन्माला येताच त्याला व्यवसायाची खाञी असल्यामुळे हिंदू मनुष्य आर्थिक विवंचनेतून मुक्त होतो. अध्यात्मिक पायावर आधारलेली ही आश्चर्यचकित करणारी अशी लोकशाही आहे.

भारताने स्विकारलेल्या संघराज्यास त्यांचा कडवा विरोध आहे. म्हणून ते भारताच्या घटनेत बदल करण्याचे आवाहन करतात. घटनेतील संघराज्यात्मक रचनेच्या सर्व उद्घोषाना मुठमाती देणे, सर्व स्वायत्त व अर्धस्वायत्त राज्ये भारत या एकाच राज्यात विलीन करणे आणि एक देश, एक राज्य, एक विधीमंडळ, एक शासनसंस्था या महान जयजयकारात पृथक अभिनिवेशाना स्थान न देता राष्ट्रवाद निर्माण करावा व घटनेची पुनर्रचना करावी वा एकात्म शासनपध्दतीची घटना तयार करावी आणि जो हे कार्य करील तो अधुनिक शंकराचार्य किंवा भारताचा अब्राहिम लिंकन म्हणून आदराने लोक त्याची पुजा करतील.

पंडीत दीनदयाळ उपाध्याय म्हणतात, भारताला धर्मनिरपेक्ष (Secular) राज्य घोषीत करुन देशाच्या अध्यात्मावरच घाव घातला आहे हे पाश्चात्याचे अनुकरण आहे. भारतीय घटनेचा आधार पश्चिमेचे ज्ञान आहे. ही उसनवारी आहे.

दत्तोपंत ठेंगडी म्हणतात, भारतीय संस्कृती, पंरपरा याचे प्रतिबिंब संविधानात नाही. वेद, वैदांगे, उपनिषदे, स्मृती, मिमांसा, रामायण, महाभारत इ. हिंदू धर्मग्रंथाचा घटनाकारांनी विचार केलेला नाही.

प्रा. सुदर्शन म्हणतात, "सध्याची राज्यघटना भारतीय मुल्यांशी सुसंगत नाही."

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांची श्रध्दा लोकांनी निवडून दिलेल्या संसदेपेक्षा धर्मसंसदेवर अधिक आहे. आज हे सर्व व्यावहारिकदृष्टया अंमलात आणणे अशक्य आहे. लोकमानस अशा बदलाना अनुकुल नाही याची जाणीव असल्यामुळे सांसदीय लोकशाहीऐवजी त्याच्या वैचारीक अधिष्टानाला जवळ असणारी अध्यक्षीय लोकशाहीचा ते पुरस्कार करतात.

प्रौढ मताधिकार मान्य करताना घटनाकांराना ही कल्पना होती की सांसदीय लोकशाहीत नवीन प्रकारचे प्रतिनिधी निवडूण येतील कारण नवे नवे लहान मोठे लोकसमुह जागृत होतील व सत्तेत वाटा मागतील. घटना समितीचे सदस्य स्वतः अप्रत्यक्ष पध्दतीने निवडून आलेले होते. त्या काळात प्रौढ मताधिकार नव्हता, इथून पुढे आपल्या सारख्यांना कदाचीत निवडूण येता येणार नाही हे माहित असूनही समता व लोकशाही यावर निष्ठा ठेवून त्यांनी प्रौढ मताधिकार हे तत्व मान्य केले.

हळू हळू सांसदीय लोकशाहीमध्ये जनतेचे खरे लोकप्रतिनिधी निवडूण येवू लागले. वरिष्ठ जातीचा वरिष्ठ वर्गीयांचा पराभव होऊ लागला. यामुळे संसदीय लोकशाहीच नको असा प्रचार पराभूत निराश पुढारी करु लागले.

अध्यक्षीय पध्दत स्विकारली तर ७० कोटी मतदार असलेल्या देशात कोणत्याही प्रकारची व्यक्ती अध्यक्षीय निवडणूकीत यशस्वी होईल. तिचा खर्च किती येईल याचा अंदाज करता येईल. अमेरिकन पध्दतीत अध्यक्ष निवडून आला की तो स्वमर्जीने मंत्री नेमतो. वीस हजार पदे अशी आहेत की, ती अध्यक्षच आपल्या मर्जीने आपल्या मित्रांना देवू शकतो. ससंदीय लोकशाही पध्दतीत लोक जागृत झाल्याने हे करणे शक्य नाही. सर्व शक्ती पणाला लावून आपला अध्यक्ष निवडून आणला की मग सर्व सत्तास्थाने आपल्या ताब्यात राहतील. प्रत्येकाला निवडणूक लढवून निवडून येण्याची गरज राहणार नाही.

त्यामुळे घटनेचे पुर्नविलोकन करण्याची व सांसदीय लोकशाही फेकुन देण्याची त्यांची मागणी आहे. जमले तर समाजवादी, धर्मनिरपेक्ष ही विशेषणे बदलावेत, सामाजिक न्याय वगैरे मुल्यांना कात्री लावावी असा त्यांचा मानस आहे.

थोडक्यात भारतीय राज्यघटनेची समिक्षा करण्याचे सुतोवाच भाजपमधील कडव्या हिंदूत्ववाद्यांच्या गोटातुन झाली आहे. भाजपला दोन वेळेस सत्तेच्या ताटावरुन उठावे लागले त्यामुळे त्या पक्षाने राजकीय अस्थिरतेचा प्रश्न अधोरेखित केला, पुन्हा पुन्हा येणाऱ्या निवडणूकाविरुध्द व्यावसायिक माध्यमाद्वारे पध्दतशीर प्रसार करून, अध्यक्षीय लोकशाहीचा पुरस्कार केला, सकारात्मक अविश्वासाचा ठराव पुढे आणून लोकसभेला ठराविक मुदत बहाल करून राजकीय हेतू साध्य करणे हे हिंदूत्ववाद्यांच्या डावपेचाचा भाग आहे. म्हणून डॉ. येरेणदास यांनी संविधानाची समिक्षा हा एक आर. एस. एस.च्या छुपा कार्यक्रमाचा भाग आहे अशी टिका केली.

या घटना समितीच्या स्थापनेच्या घोषणेपासून तीची रचना व कार्यकक्षा इ. बाबीवर अतिशय तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. डॉ. आंबेडकर यांनी अत्यंत मेहनतीने ही घटना बनविली असून त्याचे चाहते घटना मोडीत काढण्याचा कोणताही प्रयत्न सहन करणार नाहीत अशी भुमिका घेवून आंबेडकर अनुयायानी तीव्र आंदोलन छेडले. देशात ५५ टक्के मागास जाती जमातीचे लोक राहत असून त्याचा कोणीही प्रतिनिधी समितीवर नाही. अशी टिका केली. काही राजकीय पक्षानी तर या समितीची तुलना सायमन कमीशनशी करुन तिच्याविरुध्द प्रखर आंदोलन छेडण्याची धमकी दिली.

प्रजासत्ताक दिनाच्या मुर्हूतावर एकीकडे प्रधानमंत्री वाजपेयी आणि दुसरीकडे राष्ट्राचे सवोच्च पद भुषविणारे राष्ट्रपती के.आर. नारायणन यांचे घटना दुरुस्ती प्रश्नावर वेगळे दृष्टीकोण जाहीर झाले. त्यामुळे या विवादात आणखी भर पडली. त्यामुळे भाजपची राष्ट्रीय पत धोक्यात आली. भाजपने काँग्रेसचे नेतृत्व स्विकारणाऱ्या सोनीया गांधीवर वैयक्तीक हल्ला करण्यासाठी देशी-विदेशी वाद निर्माण केला. त्यांच्या भारतीय नागरीकत्वाभोवती संशयाचे जाळे निर्माण केले. भाजपच्या सत्ता काळात ख्रिश्चनावंर प्रचंड हल्ले झाले. आघाडी सरकारचा अजेंडा काहीही असला तरी आमच्या हिंदुत्वाचा अजेंडाच्या आग्रह सोडणार नाही असे माणणाऱ्या आर.एस.एस.ची एक निर्व्याज व निर्मल अशी सांस्कृतिक संघटना असल्याचे पंतप्रधानानेच जाहीर करुन आपण संघाच्या संस्काराचा मनापासून आदर करतो अशी भूमिका घेतली. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (NCERT) प्रमुखपदी हिंदूत्ववादी अधिकाऱ्याची नेमणूक करुन त्याच्या मार्फत नैतिक मुल्य रुजविण्यासाठी शाळा व महाविद्यालयातुन विविध धर्माच्या शिकवणूकीला अभ्यासक्रमात सन्मान देण्यासाठी प्रस्ताव पुढे आणला. आर.एस.एस.च्या कार्यात सरकारी नोकरांना भाग घेण्याच्या प्रस्तावाला केंद्राने अनुकुल भुमिका घेतली, एका बाजुस या बाबी घडवून आणणे आणि दुसरीकडे धर्मनिरपेक्षतेची आपली बांधीलकी व्यक्त करणे. हि दूहेरी भुमिका तत्कालीन सरकारने घेतली. धर्मनिरपेक्षता मान्य करुन सर्व धर्माबाबत सारखा आदर बाळगणे अशी व्याख्या रुजविण्याचा

प्रयत्न करणे. अयोध्येत राम मंदीर उभारणे, ३७० कलम रद्द करणे, समान नागरी कायदा आणणे यामुळे भाजपचा एक छुपा कार्यक्रम असल्याची देशामध्ये भावना निर्माण झाली. त्यामुळेच घटनेच्या मुलभूत ढाचाला हात लावणार नाही असे सरकारला वांरवांर सांगावे लागलेत. खुद्द समितीच्या अध्यक्षाने घटनेची मुलभूत चौकट व संसदीय लोकशाही कायम ठेवण्याची सरकारकडून हमी घेतल्यानंतरच त्यांनी समितीचे अध्यक्षपद स्विकारले. सामान्य माणसाच्या मनात भाजपबद्दल अविश्वास असून हा आयोग आपल्या मुळावर उठणार आहे अशी भिती त्यांच्यात वास करीत आहे.

सामान्य माणूस दारिद्रय, बेकारी, महागाई, उपासमार, अनारोग्य यामुळे मेटाकुटीला आला आहे. ४० टक्के जनता दारिद्रय रेषेखाली आजही निकृष्ट जीवन जगत आहे. वाढती लोकसंख्या, पर्यावरणाचा ऱ्हास, उध्वस्त होणारे ग्रामीण जीवन आणि बकासुराप्रमाणे वाढणारी शहरे, प्रशासकीय अधिकाऱ्याची मुजोरी व लाचलुचपत यामुळे भारतीय जीवन संकटात सापडले आहे. त्यावर कोणताही तोडगा दृष्टीपथात नाही. कोणताही राजकीय पक्ष तोडगा शोधण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करताना दिसत नाही. सर्वांनी आत्मविश्वास गमवला असून अगतिकता जीवनाचा स्थायी भाव झाला आहे. जनतेचा पाठींबा मिळविण्यासाठी लोकमत घडविण्याचा मार्ग चोखाळण्याऐवजी भावनात्मक राजकारणाच्या लाटा निर्माण करण्याचा कमी श्रमाचा राजमार्ग राजकीय पक्षांनी स्विकारलेला आहे. धर्म व जातीचे राजकारण करणे सवंग लोकप्रियतेचे मुद्दे उपस्थित करणे. राष्ट्रीय भावनेचा व्यापार करणे व भावना भडकावणे हा येथील राजकारणाचा स्थायी भाव झाला आहे.

भारतीय राज्यघटना हा एक अत्यंत मौल्यवान असा मानवी मुक्तीच फिला डेल्फीया नंतरचा महत्वाचा दस्तऐवज असल्याचे मत ग्रॅनवील ऑस्टीन यांनी व्यक्त केले आहे तर अर्नेस्ट बार्कर यांनी घटनेतील सरनाम्याची मुक्त कंठाणे स्तुती आपल्या (Principles of Social & Political Theory) या ग्रंथात केली आहे. न्यायमुर्ती एच. आर. खन्ना यांनी ही घटना म्हणजे ज्याला भारताच्या इतिहासात तोड नाही अशी श्रेष्ठ घटना आहे असे तिचे वर्णन केले.
भारतीय राज्यघटनेतील सर्व उद्दिष्टांची पुर्तता झालेली नसली तरी त्याबाबतचा दोष घटनेला द्यावयाच्या की राबवणाऱ्या व्यक्तींना याचा गंभीर विचार केला पाहिजे. असे सोला सोराबजी (Atorny General) यांनी म्हटले.

घटना समितीच्या कामकाजाचा समारोप करतान डॉ. राजेंद्र प्रसादानी म्हटले की, "जर लोकांनी निवडलेले प्रतिनिधी सक्षम व चारित्र्यसंपन्न आणि प्रामाणिक असतील तर वाईट घटनेतूनही चांगले निर्माण करु शकतील आणि त्यांच्यात ही उणीव असेल तर चांगली घटना देखील देशाला वाचवू शकणार नाही"

## धर्मवाद आणि काश्मिर प्रश्न

भारत सर्व धर्माची मातृभूमी आहे. विविध बारा धर्म भारतात अस्तित्वात आहेत. विविधतेत एकता हे आपले वैशिष्ट आहे. ते वैशिष्ट दुसऱ्या अर्थी लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेस बाधा ठरत आहे. विविधतेमुळे प्रत्येक धर्म आपल्या धर्माच्या आज्ञाचे व तत्वांचे सार्वजनिक पालन करण्याचा आग्रह धरतो. त्यातुन संप्रदायवाद व मुलतत्ववाद निर्माण होतो. सांप्रदायिक दंगली होतात. त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला खीळ बसते व राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते. भारतातील लोकशाही केवळ घटनेवर अधारित नाही तर ती भारताची परंपरा आहे. यात संस्काराचे मुख्यतः तीन गुणविशेष आहेत.

१. पर मत सहिष्णूता आणि आदर,
२. हिंसेला विरोध,
३. राजकीय स्वांतत्र्याची स्पष्ट जाणीव.

परंतु या गुणविशेषाला छेद देण्याचे कार्य प्रथम ब्रिटीशाने आपल्या 'फोडा व राज्य करा' या धोरणाने केले. ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी सर्व धर्माचे लोक विशेषतः हिंदू व मुसलमान जनता सलोख्याने नांदत होती. समाजाची विभागणी वर्गवार होती व या वर्गवारीत हिंदू व मुसलमान समान पातळीवर सामील होते. १८५७ च्या बंडात सुध्दा हिंदू मुसलमान खांदयाला खांदा लावून एकत्र लढले होते. परंतु राष्ट्रीय चळवळ जशी फोफावू लागली तशी ब्रिटीशाच्या साम्राज्याला धोका निर्माण होवू लागला. म्हणून ब्रिटीशांनी लोकांना असंघटित व आपसात भांडत ठेवण्यासाठी जे जे करता येईल ते ते सर्व केले. त्यासाठी भेदनितीचा अवलंब केला. धर्माच्या नावांवर लोकांना वेगवेगळे करण्याचे व देशात जाती व फुटीर कृतीला प्रोत्साहन द्यावयाचे धोरण स्विकारले. आपण अल्पसंख्याक मुसलमान जमातीचे कैवारी आहोत असे ब्रिटीश म्हणू लागले. त्यांनी मुसलमानांबाबत तुष्टी करणाचे धोरण स्विकारले. त्यांनी मुस्लीमांना जास्त प्रतिनिधीत्व, अनेक सवलती, १९०५ मध्ये बंगालची फाळणी करुन त्यांच्यासाठी वेगळया प्रांताची निर्मीती करण्याचा प्रयत्न, तसेच जमीनदार, शिख, ख्रिश्चन, मागासवर्गीय यांचे हीतसंबंध सुस्थितीत ठेवण्यासाठी राखीव जागांचे तत्व अवलंबून भारतीय समाजात जे दुहीचे रोपटे लावले व धर्माच्या आधारावर देशाची फाळणी केली. नंतर स्वातंत्र्योत्तर काळात त्याचा मोठा वृक्ष झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही संप्रदायवादाचे प्रमाण कमी झालेले नाही तर वाढतच आहे. सांप्रदायवाद व्यापक व उग्र स्वरुपाचा झाला आहे.

प्रत्येक धर्माच्या संघटना निर्माण झाल्या. जमाते इस्लामी हिंद, मुस्लीम मजलिश ए मुशावरद, जमीयत उल उलेमा, हिंद तामिले मिल्लत, मुस्लीम मजलिस, सिमी आणि मुस्लीम लीग इ.संस्था मुसलमानांनी आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी निर्माण केल्या. तर मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड, बाबरी मशीद कमीटी यासारख्या संघटना अतेरिकी भूमिका घेऊन जमातवाद वाढवीत आहेत. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात हिंदुत्वववादांनी मुस्लीमांना शत्रू माणण्याचे राजकारण केले, रामजन्मभुमी प्रकरण, रथयात्रा, बाबरी मशीद पाडणे, त्रिशुल वाटप इ. घटना त्यामुळे मुस्लिमांमध्ये राग, द्वेष व असुरक्षितता निर्माण होण्यास कारणीभूत ठरली. विश्व हिंदू परीषद, बजरंग दल, पतीतपावन संघटना, राममंदीर न्यास व शिवसेना या संघटनानी मुस्लीम द्वेषाचे जे वीष पेरले त्यामुळे मुस्लीमांमध्ये धर्मांधता वाढली.

## मुस्लीम दहशतवाद:

इस्लाममध्ये विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून दहशतवादाचे मुळ धरले आहे. धर्मग्रंथाचा-कुराणाचा-सर्वोच्च अधिकार मानणे, त्यातील आदेशाना त्रिकालबाधीत सत्य माणणे, त्या आदेशाचे सार्वजनिक पालन झालेच पाहिजे अशी भुमिका घेणे. धार्मिक व ऐहिक यात भेद करण्यास नकार देणे, इस्लाम धोक्यात आहे असे समजून मुस्लीमाचे संघटन करणे, आधुनिकीकरणास तीव्र विरोध करणे व पाश्चात्य मुल्यांचा त्याग करणे ही मुस्लीम दहशत वादाची प्रमुख लक्षणे आहेत. समाजरचना कुराणाच्या आदेशाप्रमाणे आणि इस्लामी परंपराप्रमाणे असावी व मानवी जीवनाचे सर्व प्रांत धर्माच्या प्रभावाखाली आसावेत. धर्म संस्था व राज्यसंस्था यांच्यातील अलगतेस नकार द्यावा. धर्मनिरपेक्षतेस व ऐहिकतावादास सोडचिठठी द्यावी अशी दहशतवादाची मागणी आहे. पैगंबरसाहेबाची राजवट व त्यांनी संघटीत केलेला समाज हे आदर्श मानणे. स्त्री-पुरुष समानतेस सक्त विरोध करणे. स्त्री-स्वातंत्र्याच्या मागणीस ते नैतिक ऱ्हासाचे लक्षण मानतात. त्यातुन लैंगिक स्वैराचाराची सुरवात होते असे त्याना वाटते. खरे स्वातंत्र्य ईश्वराची आज्ञा पाळण्यात आहे असा त्यांचा विश्वास आहे. सार्वभौम मुस्लीम राष्ट्राचे कुटुंब स्थापन करण्याचे स्वप्न ते बाळगुन आहेत.

पाश्चात्य संस्कृतीवरच त्यांचा राग आहे असे नव्हे तर पाश्चिमात्य देशावरही त्यांच्या मनात कमालीचा द्वेष व क्रोध धुमसतो आहे. पश्चिमी देशांनी इस्लामविरुध्द सतत शत्रुत्वाचे वातावरण तेवत ठेवले आहे. वसाहतिक कालखंडात त्यांनी इस्लामी देशावर लष्करी सामर्थ्याने ताबा मिळविला आहे त्याच्या भूमीवर इस्त्रायलची कृत्रिमरित्या निर्मीती केली. बोस्नीयात मुस्लीमाचा संहार केला. कुवेतच्या मुक्ती संग्रामात इराकची लष्करी सामग्री उध्वस्त केली. सलमान रश्दीने आपल्या सॅटनिक व्हर्सेस १९८९ च्या पुस्तकात प्रेषित व त्यांच्या कुटूंबाचा अपमानास्पद उल्लेख केलेला असतानाही त्यास ख्रिश्चन जगताने पांठीबा दिला व इंग्लंडने त्याला संरक्षण पुरविले.

इस्लामी मुलतत्ववादी चळवळीने १९७० पासून खरा जोर धरला. इराणमध्ये अयातुल्ला रवोमेणीच्या नेतृत्वाखाली जनतेची चळवळ उभी राहिली. त्यातून इराणच्या शहाची राजवट उलथवुन टाकण्यात आली व खोमोनीच्या मुलतत्ववादी हुकूमशाहीस प्रारंभ झाला. १९७९ या कालखंडातच दहशतवादाचा प्रसार पश्चिमी देशात वाढला. याला महत्वाचे कारण म्हणजे पेट्रोलच्या उत्पादनातुन त्या देशाची आर्थिक ताकत मोठया प्रमाणात वाढली त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यांना आपल्या संस्कृती व धर्माचा अभिमान वाटू लागला. आपल्या आर्थिक सत्तेचे राजकीय सत्तेत रुपांतर करण्याची महत्वकांक्षा या देशाच्या नेतृत्वामध्ये निर्माण झाली. परंतु पाश्चात्य देशाशी टक्कर देताना आलेल्या अपयशाने त्यांना मानखंडना सहन करावी लागली व निराशा पदरी आली. इस्त्रायलने अरबी देशांचा एकापेक्षा जास्तवेळा पराभव केला व त्या इस्त्रायलला अमेरिकेने भरभक्कम पाठींबा दिला. इराकचा १९९१ मध्ये योजनापूर्वक पराभव केला. इस्लामवर अवलंबून न राहिल्यामुळे व इस्लामवरील विश्वास ढळल्यामुळे ही मानखंडना सहन करावी लागली असा विचार या काळात बळावला त्यातुनच पश्चिमेविरुध्द कारवाई करण्यासाठी इस्लामी दहशतवाद दृढ झाला.

वसाहतवादी कालखंड संपल्यानंतर पश्चिमी आशियाई देशानी व मुस्लीम देशांनी पश्चिमी विचारप्रणालीचा स्विकार केला होता. समाजवाद, लोकशाही, उदारमतवाद, भांडवलशाही या प्रकारच्या विचारप्रणालीमुळे जनतेच्या अपेक्षा वाढल्या पण त्याची पुर्तता झाली नाही. पाश्चात्य राजकीय व्यवस्था अनेक देशात अयशस्वी ठरल्या त्यामुळेही दहशतवादास चालना मिळाली.

इजिप्तमध्ये १९२८ मध्ये इस्लामीक च्ब्रदरहूडछ या मुलतत्ववादी चळवळीचा प्रारंभ झाला. इस्लामी समाज पाश्चिमी कल्पनेमुळे भ्रष्ट होत आहे. तो शुध्द करावयास पाहिजे. शरियत कायदयाची काटेकोर अमंलबजावणी व्हावयास हवी अशा मागण्या करुन इजिप्तमध्ये नासर, नंतर सादात व मुबारक या राजकर्त्यांना नाकीनऊ आणले त्यातच सादतची १९८१ मध्ये हत्याही करण्यात आली.

अफगाणिस्तानात जेव्हा सो. युनियनने केलेल्या कारवाईला प्रत्युत्तर म्हणून तालीबानच्या हस्तक्षेपास अमेरिकेने पाठींबा दिला व तालिबानची दहशतवादी सत्ता स्थापन झाली. तालिबान्यांनी बुध्दाच्या प्राचीन मुर्ती फोडून आपला

दहशतवाद जगाला उघडपणे दाखवून दिला. हा दहशतवाद फक्त पश्चिमी देशातच आहे असे नव्हे तर तो जगातील इतर मुस्लीम देशातही वाढलेला आहे. तालिबानला पाठींबा देणाऱ्या पाकीस्तानमध्येही हा दहशतवाद व दहशतवादी संघटना कार्यरत आहेत. तेथे जमाते-इस्लामी व जम्मीयत-उलेमा-इ-इस्लाम यासारखे पक्ष उघडपणे दहशतवादाचे समर्थन करण्यात अग्रेसर आहेत. पाक राजकर्त्यांना मुलतत्ववादासी जुळवून घेतल्याशिवाय सत्तेवर राहताच येत नाही. ज. झियाची राजवट बऱ्याच प्रमाणात इस्लामी कायद्याप्रमाणे चालली होती. ती १९८८ मध्ये संपूष्टात आली. पाकीस्तानमधून फुटून निघालेल्या बांगलादेशातही आज इस्लामिक मुलतत्ववादी विचार विकसीत झलेला असुन तो तेथील शासनावर व राज्यकर्त्यावर प्रभावशिल ठरलेला आहे. विचार स्वातंत्र्य, स्त्री स्वातंत्र्य, समता या विचारांना तेथील मुलतत्ववादी विरोध करत असुन इस्लामिक कायदा हा सर्वत्र लागु करावा अशी त्यांची मागणी आहे आणि ती कार्यरत करण्यासाठी राज्यकर्त्यावर ते आपला दहशतवादी प्रभाव लादत आहेत. तस्लीमा नसरिन या लेखिकेने बांग्लादेशामध्ये घडलेल्या हिंदू मुस्लीम दंगलीचा वृतांत आपल्या लज्जा या कादंबरीत सविस्तरपणे मांडलेला आहे. हिंदू कुंटूबाचा करण्यात आलेला छळ त्यांनी सविस्तरपणे आपल्या कांदबरीत व्यक्त करून जगाचे लक्ष बांग्लादेशामध्ये प्रभावी असलेल्या दहशतवादाकडे वेधले आहे. तस्लीमा नसरीनना या त्यांच्या लेखनिक कार्याबद्यल बांग्लादेशामधुन विस्थापित व्हावे लागले आणि भारत सरकारच्या आश्रयाला यावे लागले.

मुलतत्ववादातुन धर्मयुध्दाची घोषणा दिली जाते. त्यातुन दहशतवादाची अवस्था प्रत्यक्षात अवतरते. सर्वच मुलतत्ववादी दहशतवादाचा आश्रय घेतात. इस्लामी देशात जेव्हा मुलतत्ववादाच्या मागण्या राजकर्त्यांनी अमान्य केल्या तेव्हा त्यानी दहशतवादी कारवाया सुरु केल्या. शस्त्रास्त्रांचा खुला व्यापार, अंमली पदार्थाची चोरटी आयात, यामुळे दहशतवादास जोर चढतो. पाकीस्तानसारख्या देशात चालणाऱ्या प्रशिक्षण केंद्रातून या अनुयायांना हिंसक कृती करण्याचे प्रशिक्षण दिले जाते.

ओसामा-बीन-लादेन याची अल कायदा ही संघटना जिहाद ही संरक्षणासाठी नव्हे तर इस्लामच्या मार्गातील सर्व अडथळे दुर करण्यासाठी स्थापन झाली आहे या संघटनेने दहशतवादाचा अकरा खंडाचा विश्वकोष तयार केला आहे. (इंग्लंडमधील अल मुहाजिरॉन ही संघटनाही ब्रिटीश मुस्लीमांना २५ शहरात जिहादसाठी संघटीत करते आहे.)

११ सप्टेंबर २००१ रोजी न्युयॉर्क व वाशिंग्टन येथे झालेल्या हल्ल्यात सहा हजाराहून अधिक नागरिक बळी गेले. या दहशतवादी कृत्याची तयारी एक वर्षापासुन चाललेली होती. प्रशिक्षीत आत्मघातास तयार असणारे तरुण जिहादीकडून ही योजना अंमलात आणली गेली. आंधळेपणाने विचार करण्याची व आज्ञापालन करण्याची तयारी असणारी असे आत्मघातकी संच व तुकडया लादेनकडे तयार आहेत. शिवाय अमेरिकेच्या नेतृत्वाखाली पाश्चात्य देशांनी पेट्रोलच्या साठयावर नियंत्रण मिळविण्यासाठी, शितयुध्दाच्या काळात सो. युनियनला शह देण्यासाठी, ज्यू युध्दखोरांना पाठींबा देवून दहशतवाद पोसला. याशिवाय शस्त्रास्त्राच्या कारखानाचा प्रभावही यास कारणीभूत आहे. यातुनची तालीबानची सत्ता अफगाणिस्तानात प्रस्थापित झाली. १९९८ पर्यंत अमेरिकेचा तालीबानला पाठींबा होता. थोडक्यात आखाती देशातील पैसा, पाकीस्तानमधील प्रशिक्षण व अमेरिकेने केलेला कानाडोळा यामुळे दहशतवादाचे स्वरुप जागतिक बनले आहे.

मुलतत्ववाद जेव्हा अयशस्वी होऊ लागतो व त्याचे डावपेच प्रस्थापित रचनेत कुचकामी ठरु लागतात. किंवा राजकर्ते मुलतत्वाविरुध्द दडपणूकीचे हत्यार प्रभावीपणे वापरतात तेव्हा तो आक्रमक बनतो. हिंसक कारवाया व अतिरेकी कृत्य करु लागतो. व दहशतवादाचा आश्रय घेतो. मुलतत्ववादाचा, लोकशाही पध्दतीवर, विचार विनिमयावर किंवा समझ ाोत्यावर विश्वास नसतोच. व्यक्ती स्वातंत्र्य ही कल्पना त्यांना अमान्य असते. ठरलेले कर्तव्य पार पाडण्यासाठी ते स्वतःच्या प्राणाचीही पर्वा करीत नाहीत. मुलतत्ववादातुन धर्मयुध्दाची घोषणा दिली जाते त्यातुन दहशतवादाची प्रत्यक्ष अवस्था अवतरते. मुलतत्ववाद व दहशतवाद यातील सीमारेषा फारच पुसट असते. सर्व मुलतत्ववादी दहशतवादाचा आश्रय घेताना दिसुन येतात. ईस्लामी देशात जेव्हा राज्यकर्ते मुलतत्ववाद्यांचा मागण्या अमान्य करतात तेव्हा ते दहशवादी कारवाया सुरु करतात. शस्त्रास्त्रांचा खुला व्यापार, अंमली पदार्थांची चोरटी आयात यामुळे दहशतवादास जोर चढतो.

पाकीस्तानसारख्या देशात चालणाऱ्या प्रशिक्षण केंद्रातून या अनुयायांना हिसंक कृती करण्याचे शास्त्रीय प्रशिक्षण दिले जाते. तसेच वैचारिक व भावनिकदृष्टया आत्मघातकी कारवाया करण्यासाठी त्यांना उद्युक्त करण्यात येते. जिहादमध्ये आपण सहभागी होत आहोत यात त्यांना स्वतःचा गौरव वाटतो, ओसामा-बीन-लादेन याची अल कायदा ही संघटना जिहाद ही संरक्षणासाठीच अस्तित्वात आलेली आहे. या संघटनेने दहशतवादाचा अकरा खंडाचा विश्वकोष तयार केला आहे. या संघटनेचे चाळीस देशात हजारो आत्मघातकी पथके तयार आहेत. आंधळेपणाने विचार करण्याची व आज्ञ ाापालन करण्याची तयारी असणारी असे आत्मघातकी संच, आत्मघातकी कृत्यासाठी आवश्यक असतात. त्यांना सर्व मदत व पैसा पुरविण्याचे कार्य लादेनसारखे धर्मांध नेते पार पाडीत असतात. तालीबानसारख्या संघटनाचा इस्लामिक राजकर्त्याकडुन उपयोग करुन घेतलेला आहे. अमेरिकेने पेट्रोलच्या साठयावर नियंत्रण मिळविण्यासाठी, व शितयुध्दाच्या काळात सो.

युनियनला शह देण्यासाठी, १९९८ पर्यंत तालीबानला अप्रत्यक्ष पांठीबा दिलेला होता. आखाती देशातील पैसा, पाकीस्तानमधील प्रशिक्षण व अमेरिकेने केलेला कानाडोळा किंवा अप्रत्यक्ष पाठींबा यामुळे मुलतत्ववादयांचे रुपांतर दहशतवादात झाले असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल.

**भारतातील मुलतत्ववाद -**

भारतात मुस्लीम अल्पसंख्य आहेत. जम्मू आणि काश्मीर (६४.२) शिवाय सर्व राज्यात १९९१ च्या खानेसुमारीनुसार मुस्लीम अल्पसंख्य आहेत. केरळ व पश्चिम बंगाल मध्ये त्यांचे प्रमाण २३ टक्के आहे. उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांत त्यांचे प्रमाण १७.३ टक्के आणि १६.६१ इतके आहे. कर्नाटक ११.६१ आहे महाराष्ट्रात ९.७ आहे.

देशाच्या एकुण लोकसंख्येत मुस्लीमांचे प्रमाण १२.१ टक्के आहे. देशातील नऊ जिल्हयातील त्यांचे प्रमाण ५० टक्केपेक्षा जास्त प्रमाणात आहे तर ३० जिल्हयात ते २० टक्क्यापेक्षा कमी व ८३ जिल्हयात ते १० टक्क्यापेक्षा जास्त आहे.

जवळपास १२ ते १५ कोटी लोकसंख्या असलेला मुस्लीम समाज एकजिनसी नाही. त्यांच्यात अनेक भेद आहेत. मुसलमान समाजात जातीयव्यवस्थेमुळे एक उतरंड आहे. उच्चकुलीन व कनिष्ठ असा भेद आहे. तसेच प्रादेशिक भेदही आहेत. भाषेमुळेही मुस्लीम समाजात विभागणी झालेली आहे. वर्गीय विषमता याशिवाय पंथभेदही (शिया - सुन्नी) आहेत. बहुसंख्य मुस्लीमांची परिस्थिती आर्थिकदृष्टया वाईट आहे. बेरोजगाराचे प्रमाण जास्त आहे. सरकारी व खाजगी नोकऱ्यात त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. शिक्षणाचे प्रमाण ही कमी आहे. स्वयंरोजगार, छोटे मोठे व्यवसाय, हस्तव्यवसाय, कलाकुसर, मजुरी या क्षेत्रात मुस्लीम जास्त प्रमाणात आढळतात.

फाळणीमुळे मुस्लीम समाजावर इतर समाजाचा राग आहे. फाळणीला आम्हाला का जबाबदार धरता अशी मुस्लीमाची मानसिकता वाटते. ज्या देशावर सातशे आठशे वर्षे मुस्लीम राजांनी सत्ता उपभोगली तेथे आपल्या समाजाची काय किंमत झाली आहे अशी भावना त्याच्यांत निर्माण झालेली आहे. इंग्रजांनी हिंदु मुस्लीमांमध्ये दुही माजविण्याचा पध्दतशीरपणे प्रयत्न केलेला होता. आपण अल्पसंख्य आहात म्हणून आपल्यावर अन्याय होतो आहे, अशी भावना स्वातंत्र्योत्तर काळात मुसलमानात वाढीस लागली. लोकसंख्येत १४ टक्के प्रमाण असुनही लोकसभेत मात्र ३ ते ४ टक्के त्यांचे प्रतिनिधीत्व आहे. याची खंत त्यांना आहे. राष्ट्रीय चळवळ चालु असताना हिंदुत्ववाद्यांनी घेतलेली भूमिका व स्वातंत्र्योत्तर काळातील मुस्लीमांना शत्रु मानण्याचे त्यांचे राजकारण, काँग्रेसचे अवसानघातकी राजकारण, स्युडो धर्मनिरपेक्षवाद या कारणामुळे भारतीय मुस्लीम मन संभ्रमित झालेले आहे. एकच एक ग्रंथ, सामुहिक प्रार्थना, उपासना पध्दती. सुसंघटीत धर्मगुरूची उतरंड, धर्मस्थापनेपासूनच राजकारण व धर्मकारण याची झालेली सरमिसळ अशा प्रकारच्या धर्माचे अनुयायी असलेले लोक मुलतत्ववादास सहजपणे स्विकारतात. स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी कोणताही समाज स्वःताचे वेगळेपणे जतन करण्याचा प्रयत्न करत असतो. स्वःतच्या समाजाचे अस्तित्व आणि त्यासंबधीची आवश्यक असलेली सुरक्षितता, धर्म भावना प्रज्वलित करून व अधिक प्रखर करून मिळविण्याचा प्रयत्न होत असतो.

१९ व्या शतकाच्या सुरवातीस वहाबी चळवळीने गैरइस्लामी प्रथाविरुध्द भूमिका घेवून इस्लाम शुध्द करण्याचा प्रयत्न केलेला होता. तेव्हापासुनच मुलतत्ववादी चळवळीस प्रांरभ झाला. परंतू मुलतत्ववादी सिध्दांताची मांडणी मौलाना अब्दुल अल मौदुदी (१९०३-१९७९) यांनी १९४१ साली केली. जमात -ए - इस्लामी या संघटनेची स्थापना करुन मौहदी यांनी मुलतत्ववादास सामाजिक अधार दिला. त्यांचा राष्ट्रीय काँग्रेसला विरोध होता. त्याचप्रमाणे मुस्लीम लीगमध्ये शिरलेली अधुनिकताही त्यांना मान्य नव्हती. फाळणीनंतर ते पाकीस्तानात गेले. १९४८ साली फाळणीनंतर जमात-ए-इस्लामी-हिंद या संघटनेची स्थापना मौ. अबुल लाईस इसलाही यांनी केली. जमात-ए-इस्लामीचे तत्वज्ञान थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे. इस्लामी धर्मराज्य हेच आदर्श राज्य आहे. लोकशाही, राष्ट्रवाद, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता, यास सक्त कडवा विरोध करणे कारण हे विचार इस्लाम विरोधी आहेत. भौतिकवादाच्या प्रभावामुळे नैतिक ऱ्हास झालेला आहे. म्हणून धार्मिक क्रांतीची गरज आहे. लोकांमध्ये धर्मजागृती केली पाहिजे. त्यांना कुराणाच्या आज्ञेप्रमाणे वागावयास लावले पाहिजे पश्चिमेने लोकशाही किंवा राष्ट्रवाद हे खोटे धर्म निर्माण केलेले आहेत. लोकशाही पध्दती लोकांचे सार्वभौमत्व मानते. परंतु इस्लाममध्ये फक्त ईश्वराचे सार्वभौमत्व मानले जाते. अनेक पक्ष असणे अयोग्य आहे. एकच पक्ष असला पाहिजे की जो इस्लामी राज्य प्रत्यक्षात आणू शकेल. समाजवाद, खाजगी मालमत्ता नष्ट करतो म्हणून तो इस्लामला मान्य नाही. तसेच मार्क्सवाद नास्तीकतेचा प्रसार करतो. म्हणून तो इस्लामला मान्य नाही. भारतीय संविधानातील तत्वे ठोकरुन दिली पाहिजेत. सत्तेची केंद्रीकरण करणारा शिस्तबध्द सुसंघटित पक्ष म्हणून जमाते इस्लामीने कार्य करावे. राजकारणापासून इस्लाम वेगळा करता येत नाही. धर्मनिरपेक्षता म्हणजे प्रेषिताविरुध्द जाणे होय. इस्लामी बांधवानी एकी करुन त्याचे स्वातंत्र्य संघटन करणे आवश्यक आहे. जमाते ए- इस्लामी हिंद हा पक्ष स्वतःला आर.एस.एस. संघाचा इस्लामी अवतार

समजतो. निवडणूकीच्या राजकारणात भाग घेण्याऐवजी सांस्कृतिक कार्य व धर्म कार्य करण्यात आपल्याला जास्त रस आहे. असे त्याचे म्हणणे आहे. भारतातील मुस्लीम धर्मांधतेची जमाते-ए-इस्लामी ही जननी आहे.

मुस्लीम-मजलिस-ए-मुशावरत, जम्मीयत-उल-उलेमा-तामीरे-मिल्लत, मुस्लीम मजलीस आणि मुस्लीम लीग या राजकीय पक्षाची भूमिका मुलतत्ववादी आहे. मुस्लीम लॉ बोर्ड, तबलिग जमात, बाबरी मशीद कमिटी यासारख्या संघटना मुलतत्वादी भूमिका घेताना आढळतात.

सय्यद शहाबुद्दीन बुखारी यासारखे जनता पक्ष, इन्साफ पार्टी मुजावरम असा प्रवास करणारे नेतेही धर्मांधतेच्या आहारी गेलेले दिसतात. तबलीग जमात या संघटनेची धार्मीक क्षेत्रात मुलतत्ववादी कल्पना रुजविण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. दाढी ठेवणे, टोप्या घालणे, पश्चिम आशियाई देशासारखा पोशाख करणे, पाचवेळा नमाज पाढणे, मदरसामधून शिक्षण घेणे, स्त्रियांना गुलामगिरीत ठेवणे. स्त्रियांना मशीदीस नमाज पडण्यास बंदी घालणे. त्यांना आधूनिक शिक्षणापासून शक्यतो दूर ठेवणे त्यांना स्वतंत्र स्त्रियांच्या शाळेत व कॉलेजमध्ये जाण्यास सांगणे. बाहेर पडताना बुरखा घालण्याची सक्ती करणे. तलाक देण्याची पांरपारिक पध्दत चालु ठेवणे, पोटगी देण्यास नकार देणे, समान नागरी कायद्यास कडक विरोध करणे. सिनेमा व दुरदर्शन पाहण्यास बंदी करणे. इ. मुस्लीमांच्या सर्व पक्षातील संघटनेत एकमत आहे. उर्दू माध्यमातुन शिक्षण घेण्याचा आग्रह गेल्या काही वर्षात वाढला आहे. तसेच या उर्दू शाळेची संख्याही वाढली आहे. अल्पसंख्याकाच्या संस्थाना मिळणाऱ्या सवलतीचा बेजबाबदार पध्दतीने वापर करणाचा प्रकार चालु आहे. उर्दू वृत्तपत्रांनी मुलतत्ववादी भूमिका घेवून स्वत:चा वाचक वर्ग वाढविला आहे. आखाती देशासी पूर्वी कधी नव्हता इतका संपर्क भारतीय मुस्लीमाचा वाढला आहे. त्यातुन तिकडचा मुलतत्ववाद इकडे आयात होताना दिसतो आहे. तिकडच्या अनिष्ठ प्रथाही इकडे येवू लागल्या आहेत. जगातील एकूण मुस्लीम समाजाचे आपण भाग आहोत. (Pan Islamism) ही भावना रुजवीली जात आहे. त्यातुन धार्मीक संस्थाची भरभराट होत आहे. सर्व मुस्लीमांचा एका छत्राखाली संघटीत करुन त्यांना इस्लामी देशातील चळवळीसी जोडण्याचे कार्य मुलतत्वावादी करीत आहेत. भारतातील मुस्लीमांची भारतीय म्हणून जी काही वैशिष्ठे आहेत ती पुसुन टाकण्याची जणू काही त्यांनी चंगच बांधला आहे. मुस्लीम समाजास मागास ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न ही मंडळी करीत आहेत. अल्पसंख्याकवाद वाढत आहे.

### सिमी - मुस्लीम - बजरंग दल -

स्टुडंट इस्लामीक मुव्हमेंट ऑफ इंडिया ही जमाते इस्लामी या पक्षाची विद्यार्थी संघटना आहे. तिची स्थापना २५ एप्रिल १९७७ रोजी अलीगड मुस्लीम विद्यापीठात झाली. जवळ जवळ दोन दशके या संघटनेचे फारसे कार्य नव्हते. बाबरी मशिदीचा प्रश्न जेव्हा हिंदूत्वावाद्यानी हाती घेतला तेव्हापासून व विशेषत: मशीद त्यांनी हिंसक मार्गाचा वापर करुन १९९२ मध्ये पाडल्यानंतर सिमीने आपले कार्य जोमाने चालविले. जवळ जवळ २० हजार विद्यार्थी सिमीचे सभासद आहेत असे म्हटले जाते. दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, केरळ, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश या राज्यात सिमीच्या शाखा आहेत. शिवाय काही मुलतत्ववादी संघटना सिमीच्या ताब्यात आहेत. National Democratic Front & Islamic Youth Centre या केरळातील TMMK तामीळनाडू इ. सीमीच्या मते सांसदीय लोकशाही निरूपयोगी व निरर्थक आहे. म्हणून निवडणूकीत सहभागी होण्यास ती नकार देते. इस्लामीक क्रांतीच्या दृष्टीने तयारी करण्यात ती गुंतली आहे. सुधारणावादी मुस्लीमांचा ते छळ करतात. स्व. हमीद दलवाई आणि इतर पुरोगामी मुस्लीम विचारतंवाचा ते उपहासाने उल्लेख करतात. बजरंग दलाचे ते प्रतिरुप आहे. सॅटनीक व्हर्सेस वर बंदी घालणे, गदर सिनेमावर हल्ले. बोहरा समाजाचे धार्मीक गुरव सय्यदवर हल्ला. थोडक्यात सुधारकांवर हिसंक हल्ले ते करतात. हिंदु मुस्लीम दंगली घडवून आणणे, मुंबई बॉम्बस्फोट इ. (१९९३)

### उदार आणि मानवतावादी पंरपरा :

इस्लाम निरपराध व्यक्तीची हत्या करण्यास परवानगी देत नाही. कुराणात हे स्पष्ट आहे. इस्लाम शांततेचा व सुरक्षिततेचा प्रतिक आहे. जो कोणालाही दुखवत नाही तो मुस्लीम मानावा. ज्या व्यक्तीबद्दल समाजात लोकांना भिती वाटते, दरारा वाटतो. ती व्यक्ती चांगली नाही असे प्रेषिताचे म्हणणे आहे. जिहादमध्ये सुध्दा वृध्द स्त्रिया, बालक, अशक्त व निशस्त्र लोकांवर हल्ला करण्याची मुभा नाही. बुरखा सक्ती करण्यास इस्लाममध्ये परवानगी नाही. इस्लाम इतर धर्माचा आदर करण्याची शिकवण देतो. दहशतवादास इस्लामची मंजुरी नाही.

### सुफीवाद:-

प्रेम, सहिष्णूता व लीनता माणसाच्या अमर्याद चांगुलपणावर सुफीचा विश्वास आहे. ईश्वर सर्वत्र भरुन राहिला आहे. सुफीच्या मते धर्म, वर्ण, वंश या कारणावरुन माणसामाणसात भेद करणे. परमेश्ववराला मान्य नाही - कवी हाफिज.

प्रसिध्द पर्शियन कवी (सुफी) जर तुला मुक्ती हवी असेल तर सर्वासी सलोख्याचे संबंध ठेव, मुस्लीमाबरोबर असेल तर अल्ला अल्ला म्हण, हिंदूबरोबर असेल तर राम राम म्हण, सुफीवाद स्वतःच्या आत डोकावून बघायला सांगतो.

भारतात इस्लामचा प्रसार जसा तलवारीच्या जोरावर झाला तसा संत सुफीच्या शिवणुकीमुळेही झाला.

अलिम वकील - भारतात सुफी मिशनरी १६०५ पासून यायला सुरवात झाली. अजमेरचे ख्वाजा मोईनोद्दीन चिश्ती हजरत गरीब नवाज म्हणून ते ओळखले जातात. गरीबाचे दैन्य दुर करणे व भुकेलेल्यांना खावू घालणे ही अल्लाची सर्वोच्च सेवा, अशी शिकवण त्यांनी दिली. मध्य आशियात १९४२ मध्ये जन्मलेला च्रिश्ती भारतात इस्लामची शिकवण देण्यासाठी आले त्याची एक पत्नी मुस्लीम तर एक हिंदू होती. त्यांच्या सदवर्तनानेच बऱ्याच अनुयानी मुस्लीम धर्माचा स्विकार केला

नदीसारखी दानत
पृथ्वीसारखी आदरातिथ्य
सुर्यासारखी माया

बादा फरिद सारख्या अनेक सुफींनी भारतीय भाषांत काव्य रचना केल्या आणि आपल्या सोप्या सहज सुंदर काव्यामधुन तत्वज्ञानाची मांडणी केली. सुफी संत पंरपरेत हिंदू मुस्लीम ऐक्यावर भर दिल्याचे दिसुन येते. म्हणूनच अनेक सुफी संताचे हिंदू भक्त आढळतात. निजामोद्दीन अवलिया हे ईश्वरीय श्रेष्ठत्व आणि मानवी ऐक्य व परस्पर प्रेम या विषयावर प्रवचणे देत असत आणि त्यामधुन हिंदू मुस्लीम ऐक्य साधण्याचा प्रयत्न करत असत. काश्मिरमधील बहुसंख्य जनता या सुफी संप्रदायाच्या प्रभावामुळे इस्लाममध्ये प्रवेश करती झाली. काश्मिरमध्ये आजही सुफी संप्रदायाचा प्रभाव दिसतो.

भारतातील मुसलमानांनी मुलतत्ववाद्याच्या आहारी जावयाचे की इस्लाममधील उदार व मानवतावादी जोडून घ्यावयाचे हे ठरविले पाहिजे. हिंदूत्ववादाशी टक्कर देण्यासाठी मुलतत्ववाद पुर्णपणे निरोपयोगी ठरणार आहे. इस्लामी मुलतत्ववाद व हिंदूत्ववाद हे दोन्ही नवफॅसिझमचे प्रकार आहेत.

जगातील मुस्लीम देशाची संख्या ५५ आहेत परंतु ६ ते ७ देशातच लोकशाही किंवा लोकशाही सदृश्य राजवटी आहेत. भारतीय मुस्लीमांचे भाग्य हे की आपल्या देशात लोकशाही व्यवस्थेत ते राहतात.

### निष्कर्ष आणि समारोप

वस्तुतः धर्म म्हणजे सत्यशोधनाची अविश्रांत साधना. इश्वरी अस्तित्वाचा शोध घेण्याच्या मानवाच्या अखंड प्रयत्नामधूनच धर्म ही व्यवस्था आकारास आलेली असावी. साधारणपणे मानवी जीवन निर्धारित करणारी, समाजजीवनाला अत्युच्च जीवन सिध्दांताची बैठक पुरवणारी व्यवस्था म्हणूनच धर्माकडे पाहिले जाते. धर्म ही केवळ मानवी अंर्तमनावर नियंत्रण करणारी व्यवस्था नसून ती समाज, समाजाचे अर्थकारण, संस्कृती इ. ना निश्चित नैतिकता पुरवणारी आणि सामाजिक जीवनाचे संघटन करणारी संस्था आहे. भारतीय हिंदू तत्वज्ञानात मुख्यतः दोन विचार परंपरा आहेत. भोतिकवादी आणि चैतन्यवादी. अगदी ऋगवेद काळापासून विकसित होत गेलेली वैदिक विचार परंपरा, या वैदिक विचारपरंपरेत अंर्तभूत असलेली वेद, स्मृती, शास्त्रे, पुराणे इ. समावेश असून या विचारपरंपरेवर समांतर पध्दतीने विकसित होत गेलेली चार्वक विचार परंपरा, जैन तत्वज्ञान, बौध्द तत्वज्ञान इ. सविस्तरपणे भारतीय तत्वज्ञानाच्या संदर्भात विचार करणे क्रमप्राप्त ठरते. वस्तुतः विविध विचारपरंपरा हिंदू धर्मात विकसित झालेल्या आहेत परंतु हिंदु धर्माच्या तात्विक अधिष्ठान संदर्भात विचार होण्याऐवजी वर्णाश्रम व्यवस्था आणि जातीय श्रेणीबध्दतेच्या संर्दभातच हिंदू धर्माचा विचार मांडला जातो. ब्राम्हणांचे वर्गीय श्रेष्ठत्व आणि समाजाचे त्यांच्याकडे आलेले नेतृत्व आणि स्वहित जोपासण्याचे व संवर्धित करण्याचे त्यांची मानसिकता हिंदू धर्माचे शुध्द स्वरुप व सामाजिक जीवन भ्रष्ट व विषम विरूप स्वरुपात अभिव्यक्त करण्यास कारणीभूत ठरण्याचे आढळते.

हिंदू धर्माबददल ज्याला आदि नाही आणि अंत नाही असा हा धर्म आहे असे म्हटले जाते. हिंदुत्व हा अखंड परिसंवाद आहे. अनंताचा शोध घेणारा, सत्यशोधनाचा तो मार्ग आहे. हिंदूधर्माबाबत विशिष्ठ धर्म संस्थापक, धर्मग्रंथ, विशिष्ठ एकच देवता अशा मर्यादा नाहीत. वास्तविक पाहता सत्यशोधन आणि त्या संबंधिचा मार्ग व अनुभुती व्यक्तिगत असून प्रत्येक व्यक्तिला विचार स्वातंत्र्य आहे. हिंदू धर्माला A way of Life जीवन पध्दती, जीवन मार्ग असेही काहीजन म्हणतात. विविध विचारपंरपरा, विविध जीवनपध्दती, आचाराने युक्त असा हा धर्म आहे. प्रत्येक कालखंडातील विचारवंतानी या धर्माला स्वतच्या प्रज्ञेनुसार व्यापकत्व बहाल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे अनेक जीवन प्रवाहाचा, पध्दतीचा संगम या धर्मात आढळतो. हिंदु धर्माचे तात्विक स्वरुप अभ्यासताना आपणांस या धर्मासी संबंधित ज्या तत्वज्ञानाची निर्मिती

झाली त्याचे स्वरुप अत्यंत व्यापक आहे हे लक्षात येते. या देशात जी अनेक दर्शने निर्माण झाली ती अभ्यासल्यास तत्वज्ञानाच्या क्षेत्रात या देशातील विचारवंतांनी मौलिक भर टाकल्याचे जाणवते. यज्ञ परंपरेशी निगडित असलेली वेदपरंपरा जैन तत्वज्ञान, बौध्द तत्वज्ञान, निरीश्वरवाद भक्ती संप्रदाय या विविध वैचारिक परंपरा निर्माण झाल्याचे दिसते या सर्व ज्ञानाचा आणि तात्विक चिंतनाचा विचार हिंदू तत्वज्ञानाच्या अनुषंगाने मांडण्याची परंपरा येथे आहे.

## संदर्भ ग्रंथ


१ जातीयतेचे स्वरूप, कारणे व उपाय — हमीद दलवाई, साधना प्रकाशन, १९७८.
२ सावरकर — धनंजय किर.
३ विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड - ३ — य. दि. फडके, श्री. विद्या प्रकाशन, पुणे.
४ हिंदूत्व दर्शन, सुविचार — द. न. गोखले.
५ स्वा. सावरकर एक रहस्य — द. न. गोखले.
६ वि. दा. सावरकर एक चिकीत्सक अभ्यास — प्र. ल. गावडे.
७ शोध सावरकराचा — य. दि. फडके.
८ क्रांती कल्होळ — जोशी, मनोरमा १८५,पृष्ठ १७२.
९ मानव आणि मार्क्स — प्रभाकर पाध्ये, श्री. विद्या प्रकाशन १९८०.
१० — नारायण हरी पालकर.